MHWS10018762023

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०४६/२०२३

महाराष्ट्र शासन वि. अनिल प्रल्हाद चोंडकर

न्यायनिर्णय नि.क्र. ०६ खाली

# न्यायनिर्णय

**( घोषित तारीखः १६.०३.२०२६ रोजी घोषीत )**

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम **६५(ई)** प्रमाणे दोषारोप ठेवुन चालविण्यात आला.

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | १८.०७.२०२३. |
| प्रथम खबर अहवालाचा दिनांक(Date of FIR) | १८.०७.२०२३. |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Chargesheet) | ०३.११.२०२३ |
| दोषरोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक<br>(Date of framing of charge/particular) | २४.०६.२०२५. |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक<br>(Date of commencement of Evidence) | ०६.०२.२०२६. |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक<br>(Date on which Judgment is reserved) | युक्तीवाद ऐकल्यानंतर तात्काळ न्यायनिर्णय देण्यात आला. |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक<br>(Date of the Judgment) | १६.०३.२०२६. |
| शिक्षा दिल्याचा दिनांक<br>(Date of sentencing Order, If any,) | -- |

| **अ.क्र.** | **आरोपीचे नांव** | **अटक केल्याचा दिनांक** | **जमानतीवर सोडल्याचा दिनांक** | **कलम** | **मुक्तता अथवा शिक्षा** | **शिक्षा** | **न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनिल प्रल्हाद चोंडकर | अटक नाही | २४.०६.२०२५. | मु.दा.अधि. कलम **६५(ई)** प्रमाणे | निर्दोष | -- | -- |

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढिलप्रमाणे–</u>**

०२. शासना तर्फे फिर्यादी पो.हे.कॉ. प्रदिप गणपत लांडगे, ब.क्र.१०७६, पो.स्टे. मालेगांव यांनी फिर्याद दिली की, दि.१८.०७.२०२३ रोजी ते पोलिस स्टेशनला हजर असतांना त्यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, अनिल प्रल्हाद चोंडकर हा ग्राम गांगलवाडी येथे पाण्याचे टाकीजवळ अवैधरीत्या विक्री दारुची विक्री करीत आहे. अशा माहितीवरून ते घटनास्थळी दोन पंचाना सोबत घेवून गेले. पंचासमक्ष त्यांनी आरोपीच्या हातातील प्लास्टीक कॅनची पाहण केली असता त्यामध्ये १७ लिटर गावठी हातभट्टीची दारू किंमत अंदाजे १७५०/– रूपयांचा मुद्देमाल मिळून आला. मुद्देमालातून १८० दारू वेगळी काढून एका चापट काचेच्या शिशीत भरून त्याला त्यांचे, पंचाचे व आरोपीचे सहीचे कागदी लेबल लावून मोक्यावर लाखेने सिलबंद करून सिए तपासणी करीता राखुन ठेवले व उर्वरित मुद्देमाल पंचासमक्ष योग्य स्थळी नाश करण्यात आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलिस स्टेशन येथे खबर दिली. तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०३. फिर्यादीच्या खबर अनुषंगाने गुन्हा क्र. ३३२/२०२३ नोंदविला गेला व तपासअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले गेले. आरोपीविरुध्द आरोप (नि.क्र.०६ खाली) निश्चित केले असता त्याने गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षा घेण्याची विनंती केली. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळून न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०४. सरकारी पक्षाच्या आरोपावरुन खालील मुद्दे निष्पन्न होतात. या मुद्यांचा निष्कर्ष मी समोर दिला असून त्याची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष शाबित करतो काय की, दि. १८.०७.२०२३ रोजी मौजे गांगलवाडी, ता. मालेगांव येथे आरोपीच्या ताब्यातून एका प्लास्टीक कॅनमध्ये १७ लिटर गावठी हातभट्टीची दारू किंमत १७५०/– रूपयांचा मुद्देमाल विना परवाना ताब्यात बाळगतांना आढळुन आला व त्यायोगे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम **६५(ई)** अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला काय ? | **...नाही.** |
| २. | आदेश काय? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीता</u>–**

०५. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द संशयाच्या पलीकडे जावून गुन्हा सिध्द करणे आवश्यक आहे व तसा पुरावा न दिल्यास आरोपी हा संशयाचा फायदा घेवुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे हे फौजदारी खटल्यातील ठरलेले तत्व आहे. प्रस्तुत खटल्यात आरोपीच्या ताब्यातून एका प्लास्टीक कॅनमध्ये १७ लिटर गावठी हातभट्टीची दारू किंमत १७५०/– रूपयांचा मुद्देमाल विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आल्याचे तथ्य वाजवी संशयापलीकडे जावून निर्विवादपणे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाचे खांद्यावर आहे. त्या अनुषंगाने अभिलेखावरुन पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

०६. सदर खटल्यात अभियोग पक्षाच्या वतीने एक साक्षीदार तपासण्यात आला आहे. साक्षीदार क्र.०१ प्रकाश तुकाराम इंगळे (नि.क्र.०९) यांची घटनास्थळ जप्ती पंच म्हणुन साक्ष नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने सरतपासात कथन केले की, दि. १८.०७.२०२३ रोजी पोलिसांनी त्यांची सही घेल्याचे, परंतु त्यादिवशी ते पोलीसांसोबत कोठेही गेले नसल्याचे, त्यांच्यासमक्ष कुठलाही पंचनामा केला नसल्याचे व काहीही जप्त केले नसल्याचे कथन केले. घटनास्थळ जप्ती पंचनामा वरील अ.क्र.०१ वर त्यांची सही असल्याचे, परंतु त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केलेले नसल्याने विद्वान सहा.सरकारी अभियोक्ता यांनी कसुन उलटतपास घेतला. मात्र अभियोग पक्षाला सहाय्यभुत होईल असा सबळ पुरावा पटलावर आला नाही. सबब, पंच साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षाला उपयुक्त ठरत नाही.

०७. प्रस्तुत प्रकारच्या खटल्यांमध्ये जप्ती पंचनाम्यास अनन्य साधारण महत्व असते. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिले असता अभियोग पक्षाने रासायनिक पृथःकरणाचा अहवाल दाखल केलेला नाही. याशिवाय आरोपीकडून जप्त करण्यात आलेली कथित दारु प्रत्यक्षात प्रतिबंधित वस्तू असल्याचे दाखविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. कारण रासायनिक पृथःकरणाचा अहवाल जो की, आरोपीचा दोष ठरविण्यासाठी एक निर्णायक पुरावा असतो तो अहवाल अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर पुराव्याअभावी, कोणत्याही परिस्थितीत आरोपीचा अपराध सिद्ध होऊ शकत नाही. पंच साक्षीदार फितुर झाल्याने जप्ती पंचनामा निर्विवादपणे सिध्द झालेला नाही. तसेच, अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवूनही फिर्यादी, तपासी अमंलदार आणि इतर महत्वाचे साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षाने नोंदविली नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे जप्ती पंचनामा हा साक्षीदारांच्या पुराव्यातुन शाबित केलेला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला आणि आरोपी हा दारुचा परवाना नसतांना दारू विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात मिळुन आल्याचे तथ्य अभियोग पक्षाने वाजवी संशयापलिकडे जावुन निर्विवादपणे शाबीत केलेले नाही.

०८.	एकंदरीत पटलावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता मी आरोपीस सदरील प्रकरणातून योग्य त्या पुराव्याअभावी संशयाच्या बळावर दोषमुक्त होण्यास पात्र समजतो व त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.२ करीता पुढिल आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१.	आरोपी **अनिल प्रल्हाद चोंडकर** यांना मुंबई दारुबंदी कायदा कलम **६५(ई)** अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२.	जप्त मुद्देमाल एका पांढ–या रंगाची प्लास्टीक कॅनमध्ये १७ लिटर गावठी हातभट्टीची दारू पंचासमक्ष नाश करण्यात आली. तसेच जप्त मुद्देमालमधून एक १८० एमएल ची सिलबंद क्वॉर्टर रासायनिक परिक्षणाकरीता दारू एका लाखशिल चापट काचेच्या शिशीत राज्य उत्पादन शुल्क, वाशिम यांच्याकडे अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट करण्यासाठी पाठविण्यात यावी.

३.	अभियोग पक्षाने प्रस्तुत निकालाविरूध्द मा.वरिष्ठ न्यायालयात दाद मागितल्यास आरोपी हे नोटीस मिळताच स्वतःहून हजर राहतील याचे खात्रीसाठी आरोपीने आजपासून सहा महिण्याच्या कालावधी करीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ (१) प्रमाणे अन्वये पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

AMIT SUNIL KOSHTI
Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2026.03.16 17:43:43 +0530

मालेगांव
दिनांक : १६.०३.२०२६.

**(अ. सु. कोष्टी)**
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्र.२
मालेगांव, जि. वाशिम.

**सूची–I**

**अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ.अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१–नि.क्र.०६ खाली | प्रकाश तुकाराम इंगळे | घटनास्थळ जप्ती पंच |

**ब.आरोपीचे साक्षीदार, असल्यास :–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी :–**

**अ.अभियोगपक्ष :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ०१. | दोषारोपपत्र |

**ब. आरोपी :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालय :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड. मुद्देमाल :–**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

AMIT SUNIL KOSHTI
Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2026.03.16 17:43:34 +0530

मालेगांव
दिनांक : १६.०३.२०२६.

**( अ. सु. कोष्टी )**
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्र.२
मालेगांव, जि. वाशिम.

## CERTIFICATE

I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Judgment :-

| | | |
|---|---|---|
| 1. Name of the Stenographer | :- | **Shivam B.Patange (L.G.)** |
| 2. Court Name | :- | Jt. CJJD & JMFC, Malegaon |
| 3. Judgment dated | :- | 16.03.2026. |
| 4. Judgment Signed by the P.O. | :- | 16.03.2026. |
| 5. Judgment uploaded on | :- | 16.03.2026. |